# डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी), पुणे

(महाराष्ट्र शासनाच्या सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाची स्वायत्त संस्था)
२८, क्वीन्स गार्डन, कॅम्प, पुणे - ४११००१.

E-mail: youthleadership@barti.in Web: https://barti.maharashtra.gov.in

## "७ ते १४ वयोगटातील बालकांसाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकर ह्यांच्या विविध वेशभुषा व संवाद सादरीकरण" या विषयावर राज्यस्तरीय स्पर्धा

बार्टीमार्फत दि. ०७ एप्रिल २०१७ ते १४ एप्रिल २०१७ या कालावधीत भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १२६ व्या जयंती निमित्त समता सप्ताह साजरा केला जाणार आहे. त्यानिमित्त विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येत आहे.

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १२६ व्या जयंती निमित्त **"७ ते १४ वयोगटातील बालकांसाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकर ह्यांच्या विविध वेशभुषा व व संवाद सादरीकरण"** स्पर्धेचे आयोजन केले आहे.

**डॉ. बाबासाहेब आंबेडकर** यांनी त्यांचे आयुष्यात उठावदार व दिमाखदार वेशभुषेला अत्यंत महत्व दिले आहे. त्यामुळे वेगवेगळ्या वेशभुषेतील त्यांची छबी विशेष छाप पाडून जाते. डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी त्यांचे आयुष्यात वेगवेगळे पेहराव परिधान केल्याचे आढळते उदा. सूट,बूट व कोट/कोट,सदरा व धोतर/जोधपूरी/चिवर/सूट,बूट,कोट,टाय व हॅट/शर्ट, पँट, हॅट इत्यादी तरी सदर स्पर्धेत भाग घेऊ इच्छिणाऱ्या स्पर्धकांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांसारखा विशिष्ट पेहराव परिधान करुन त्या पेहरावातील प्रसंगाशी अनुसरून त्यांचे मौलिक विचारांवर आधारीत संवाद सादर करणे असे स्पर्धेचे स्वरुप असेल.

**स्पर्धेच्या नियम व अटी:-**

१. **"वयोगट"**- ७ ते १४ वर्षे

२. स्पर्धेत सहभागी होणाऱ्या पालकांनी आपल्या पाल्याची माहिती दि. १० एप्रिल २०१७ रोजी कार्यालयीन वेळेपर्यंत वरील पत्यावर पाठवावे. पालकांनी स्वताचे पूर्ण नाव, पाल्याचे पूर्ण नाव, वय, पत्ता, इमेल आय.डी, मोबाईल नंबर सहित सहभाग नोंदवावा.

३. निवड झालेल्या स्पर्धकांना दि. ११ एप्रिल २०१७ पर्यंत कळविण्यात येईल तसेच निवड झालेल्या बालकांना दि. १२ एप्रिल २०१७ रोजी सादरीकरणासाठी आमंत्रित केले जाईल.

४. **संवाद सादरीकरणाची कमाल** वेळ मर्यादा २ मिनिटे. निवड झालेल्या प्रथम तीन उत्तम विजेत्यास रोख पारितोषिक रक्कम: प्रथम क्र. रु.३०००/-, द्वितीय क्र. रु.२०००/- तृतीय क्र. रु.१०००/- व प्रमाणपत्र दिले जाईल व ११ स्पर्धकांना उत्तेजनार्थ रु.५००/- बक्षीस दिले जाईल.

५. **"डॉ. बाबासाहेब आंबेडकर ह्यांच्या विविध वेशभुषा व संवाद सादरीकरणे " याविषयावर** अर्ज पाठविण्याकरिता अंतिम दि. १० एप्रिल २०१७ रोजी कार्यालयीन वेळेपर्यंत असेल. वरील सर्व बाबतीत निर्णय घेण्याचे व त्यात बदल करण्याचे किंवा त्या रद्द करण्याचे अंतिम अधिकार महासंचालक, बार्टी यांचेकडे असतील.

अधिक माहिती साठी ह्या मोबाईल नंबरवर संपर्क करावा-९४०४९९९४४५

तसेच अधिक माहिती **Web: https://barti.maharashtra.gov.in** येथील **Notice Board** वर **डॉ. बाबासाहेब आंबेडकर ह्यांच्या विविध वेशभुषा व संवाद सादरीकरण** या लिंक वर उपलब्ध आहे.

**राजेश ढाबरे, भारासे**
महासंचालक,बार्टी

**Advt/YLTP/04/04/2017/52**

Ad no. 52
16 x 14 cm b.w_01
03